## प्रकरण पहिले

# मराठी कथा-वाड्·मयाची वाटचाल

प्रकरण पहिले

## मराठी कथा-वाड्·मयाची वाटचाल

"जगातील अबाल वृध्दांना प्रिय असलेल्या कथा वाड्·मयाची भारत ही भूमी आहे·" असे अनेकांचे प्रतिपादन आहे· तथापी हा सिध्दांत विवादास्पद ठरलेला आहे· तरीसुध्दा भारतातील कथावाड्·मयाची परंपरा पहाता भारत ही कथा-वाड्·मयाच्या दृष्टीने अत्यंत समृध्द अशी भूमी आहे, ही वस्तुथिती नाकारता येत नाही·

भारतातील प्राचीन साहित्य म्हणजे वैदिक भाषेतील वेद हे होय· ऋग्वेदापासून अनेक कथा भारतात आजपर्यंत सर्वश्रुत आहेत· भारतातील विविध भाषातून जसे विविध प्रकारचे कथाभांडार सापडते तसेच विविध बोलीतही ते असल्याचे आढळून येते· मात्र या सर्व कथाभांडारात वैदिक पूर्वावस्थेपासूनच्या अनेक खुणा आढळून येतात·

"कथा" हा शब्दच तिच्या आद्य आणि सनातन (नित्यनूतन) पणाचा आणि मौखिक असण्याचा पुरावा म्हणता येईल· "जी कथन केली जाते ती कथा व जी वाणीने सचेतन केली जाते ती "कथा" हा कथा शब्दाचा अर्थ आहे·"[1] असे तारा भवाळकर यांनी स्पष्टपणे म्हटले आहे·

भाषा शब्दाची व्युत्पत्ती = भाष् म्हणजे बोलणे या धातूपासून आहे· यावरुन बोलणे, उच्चारणे हे भाषेचे व कथेचेही अंगभूत स्वाभाविक कार्य आहे· भाषेचा जन्मच मुळी कथनाच्या तीव्र आंतरिक गरजेतून झाला आहे· भाषेचे आद्यरूप कथारूपच असल्याचे दिसून येते· कारण भाषेत जन्माला आलेला प्रत्येक शब्द एकेक कथाबीज उदरात घेवूनच जन्माला आला आहे· भाषेत जन्माला आलेला प्रत्येक शब्द कथागर्भवाहक आहे, असे अनेक भाषाअभ्यासकांचे मत आहे·

भारत ्या कथाप्रिय देशातील लोकांनी कथांकडे पूर्वीपासून आजपर्यंत अत्यंत भाविकतेने पाहिले आहे. उदा.वेदात कितीतरी कथात्मक सूक्ते आहेत. श्री.ना.गो. चाफेकर यांनी त्यांच्या "वैदिक निबंध" या पुस्तकात ऐतरेय ब्राह्मण्यातील 43 आख्यायिका दिलेल्या आहेत. शतपथ ब्राह्मण्यांत उर्वशी आणि पुरूरवा यांची कथा आलेली आहे. ऐतरेय ब्राह्मण्यात "आख्यान" §7.18.10§ तर तैतरेय "आख्यानविद्" §2.25.1§ असा शब्द आला आहे. शतपथ ब्राह्मण्यात "अन्वाख्यान" असे शब्द आले आहेत. ऋग्वेदात शुनःशेपंकथा §1.24.30§ गोतमकथा §1.85§ त्रितकथा §1.105§, शृंगवृसकथा §8.17§ अशी अनेक कथासूत्रे आढळतात.[2]

पुढील काळात निरनिराळ्या संप्रदायाच्या लोकांनी पारंपरिक कथांचा हा ओघ असाच पुढे चालू ठेवला. सर्व धार्मिक संप्रदाय या पारंपरिक कथा परंपरेनेच पुष्ट झालेले आहेत. पुढे पुढे मात्र कालौघात या कथा लौकिक प्रकारात बदललेल्या दिसतात तर काही कथांची वाड्.मयग्रंथात रूपांतरे झाली.

पहिल्या पिढीकडून दुस-या पिढीकडे चालत आलेल्या या पारंपरिक कथांचा पहिला संग्रह ग्रंथ गुणाढ्याचा पैशाची भाषेत "बृहत्कथा" या नावाने प्रसिध्द झाला. हा ग्रंथ म्हणजे संस्कृत नाटककारांचे प्रेरणास्थानच आहे. या ग्रंथाने शूद्रक, भास, हर्ष या वाड्.मयलेखकांना भरपूर कथानके पुरविली. गुणाढ्याप्रमाणे वररूची हाही त्याकाळी महान कथासंग्रहकार होता. वररूची व गुणाढ्य दोन्ही कथालेखकांना भारतीय कथांच्या परंपरेत महत्त्वाचे स्थान आहे.

"पंचतंत्र" हा तत्कालिन महत्त्वपूर्ण कथाग्रंथ असून विष्णुशास्त्री नावाच्या लेखकाने राजकुमारांनाच नीतीचे शिक्षण दिले. "हितोपदेश", "वेताळपंचविशी" "सिंहासन द्वात्रिंशिका" "शुकसप्तति" हे ग्रंथही भारतीय कथासंपन्नतेचा पुरावा देतात. बौध्द आणि जैन यांनीही ही कथा परंपरा जिवंत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले. "बौध्द जातक" आणि "जैन चूर्णी" हे लोककथांच्या नीतिकथा प्रकारांचेच संग्रह आहेत. "महाभारत व रामायण" मधील नीतिकथा या प्राचीन स्वरूपाच्या नीतिकथा प्रभावी व प्रत्ययकारी आहेत, याची आजही आपणास कल्पना येते.

डॉ·विन्टरनीझ यांनी परंपरागत कथावाड्·मयाचा विशेष म्हणजे संस्कृत साहित्यातील सर्व ललितकृतींना लोकांच्यामध्ये चालत आलेल्या पारंपारिक कथांचा आधार आहे, असे केलेले प्रतिपादन लक्षात घेवून प्रभाकर मांडे यांनी मराठी वाड्·मयाची प्राचीन परंपरा सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे· त्याचबरोबर प्रभाकर मांडे यांनी डॉ·श्री·व्यं·केतकर यांचे पुराण वीरांविषयी जनमानसात अनेक कथा रूढ होत होत्या, असे सांगितले आहे· कालांतराने समाजात रूढ असलेल्या या अशिष्ट वाड्·मयाचे "शिष्टीकरण" झाले· लौकिक वाड्·मय संस्कृत वाड्·मय समाविष्ट झाले असे केलेले प्रतिपादन लक्षात घेवून कथा वाड्·मयाची प्राचीन परंपरा सिध्द केली आहे· प्रभाकर मांडे यांनी लोकांच्यामध्ये प्रचलित असलेल्या लोककथा आणि उपलब्ध असलेले संस्कृत कथात्मक साहित्य यांचा संबंध स्पष्ट करण्याचा केलेला प्रयत्न भारतातील कथा-वाड्·मयाची प्राचीन परंपरा सिध्द करण्यास उपकारक आहे·

भारतातील कथापरंपरा प्राचीन असल्याचा निर्वाळा पाश्चात्य थिओडोर बेनफे[3], कॉक्सिन[4]सारख्या विद्वानांनी दिला आहे व त्यांनी जगातील सर्व लोककथांचे मूळ भारतातील पंचतंत्रात सापडते असे सांगितले आहे· डॉ·के·डी·उपाध्याय यांनीही ते ग्राह्य मानले आहे· भाषाशास्त्राचे पंडित व अभ्यासक ग्रिम व मॅक्सम्युलर यांनीही "भारतीय कथावाड्·मय हे जागतिक कथावाड्·मयाचे मूलस्त्रोत आहे, असे मानले आहे·"[5]

भाषेच्या सहाय्याने मानवाचे विचार प्रगल्भ होत गेले व त्याने स्वतःच्या अस्तित्वाविषयी, जगाविषयी, सूर्य, चंद्र, तारे इ·विषयी विचार करण्यास सुरूवात केली आणि पुढे पुढे तर कथांच्या आधारे ह्या सृष्टीच्या स्पष्टीकरणाचा प्रयत्न केला· याच प्रयत्नातून दैवतकथा किंवा दिव्य कथा निर्माण झाल्या आहेत· माणूस जन्माला आला आणि दुस-याची बोलण्याची कला त्याला आली· तेव्हापासून कथेचा जन्म झाला व गोष्टीवेल्हाळ म्हणून माणसाची ख्याती झाली· मराठीतील कथेचा प्रारंभ संस्कृतमधील "हितोपदेश"मधून आलेल्या कथांमधून सापडतो· आख्यायिका, लोककथा, सुरस गोष्टी नवलकथा, चातुर्य कथा वगैरे सर्व प्रकार कथावाड्·मयप्रकारात मोडतात· या संदर्भात डॉ·सरोजिनी बाबर म्हणतात – "सांगणाराची कुवत आणि

ऐकणाराची संस्कृती या दोन मुख्य बाबींवर कथेचे संगोपन होत गेले· तिची उभारणी झाली ती सामाजिक जीवनावरील सुखदु:खावर, त्यामुळे उंचबळून येणा-या भावनावर आणि संबंधित झालेल्या चिंतनावर त्या कारणाने त्या कारणाने कधी ती आकाराने प्रदीर्घ होई·[6]

लोकपरंपरेतील कथासंभार पाहिला तर अक्षरश: (वाक्मय - मौखिक) परंपरेने चालत आलेला आढळतो· विविध प्रकारच्या बहुतेक कथांची बीजे मानवाच्या आदिसमूह मनात दडलेली आहेत· मानवाच्या समुहमनाच्या अनुभवाशी या कथा बीजांचे नाते जडलेले आहे· लोककथातून अविष्कृत झालेले अनुभवविश्व हे लोकमनाचे दर्शन घडविते· लोकमनाची सर्व स्पंदने भोवतालच्या जगाशी संवाद साधत असतात· प्राचीन काळापासून कथा कुठल्या ना कुठल्या स्वरूपात अवतीर्ण झालेली दिसते· त्यामुळे मराठी कथेला ऐतिहासिक रूप येऊ लागले म्हणूनच येथे कथेचा इतिहास लक्षात घेणे आवश्यक ठरते· कथा हा वाड्·मयप्रकार फार सनातन आहे· कथाकाराला सांगण्याने व श्रोत्याला ऐकण्याने पुण्यप्राप्ती होईल असे सांगितले जात होते· मराठी कथा ही ग्रंथनिर्विष्ठ होण्यापूर्वी मौखिक स्वरूपात लोककथेच्या रूपाने अस्तित्वात होती·

चिऊकाऊची कथा आपण पिढ्यान पिढ्या ऐकत आलो आहोत यावरून लोककथा ही मराठी भाषेची पायाभरणी म्हणावी लागेल· लिखित स्वरूपात कथा प्रथम आढळते, ती महानुभाव पंथीय वाड्·मयात महानुभाव साहित्यातील लीळाचरित्रात महानुभाव पंथाचे आद्य प्रणेते श्री·चक्रधर स्वामी यांच्या आठवणी गुंफल्या आहेत· त्यांच्या जीवनातील विविध प्रसंग कथारूपाने लीळाचरित्रात मांडले आहेत· लीळा-चरित्रातील प्रत्येक दृष्टांत ही एक छोटी कथा आहे· ती आशयगर्भ व जीवनानुभवनिष्ठ कथाच आहे· कथा सांगण्यात-ऐकण्यात श्रोत्याचा सहभाग असतो· किंबहुना श्रोता हा पूर्वी अविभाज्य घटक असे· एकंदरीत कथाकार व श्रोते यांच्या संयोगातून कथा फुलत असे· मुद्रणपूर्व काळात कथाकार-श्रोता यांचा जीवनसंबंध असे, तो संबंध मुद्रणकला आल्यानंतर राहिला नाही·

प्राचीन मराठी काव्यपरंपरेमध्ये एकनाथांनी आपल्या भागवत ग्रंथात श्रीकृष्णकथा सांगितल्या तर भावार्थ रामायणात रामाच्या कथा सांगितल्या आहेत· वामन पंडित, मोरोपंत आदि पंडित कवी एक प्रकारचे कथाकारच· रघुनाथ पंडित, सामराज, महिपती यांनी आख्याने सांगितली· "पांडवप्रताप", "रामविजय", "हरिविजय", "संतलीलामृत" इ·पोथ्यातून आख्यायिका आल्या· या सोप्या ओवी वृत्तात होत्या· त्यामुळे या विलक्षण सुबोध आहेत· प्राचीन काळापासून भारतात विविध प्रकारच्या कथा वेद, उपनिषदे यासारख्या लिहिल्या गेल्या· "बृहतमंजिरीकथा" किंवा "कथासरित्सागर"सारखी कथा संपादनेही झाली आहेत· रामायण-महाभारताच्या कथाही विविध प्रकारे लिपीबध्द झाल्या आहेत· पण याचबरोबर या कथांचे मौखिक चलनही चालूच असते· पुन्हा काही काळ गेल्यानंतर किंवा स्थलपरत्वे या कथा लिखित स्वरूपातही येतात· मौखिक-लिखित असे या कथांचे चलनचक्र चालूच असते· मराठीत देवादिकांच्या, सणांच्या, व्रतांच्या कहाण्या पूर्वीपासून चालत आल्या आहेत· अर्वाचीन मराठीतील प्रारंभीच्या कथा संस्कृत-इंग्रजी भाषेतील भाषांतरे आहेत· सन 1806 मध्ये तंजावर येथील सर्फोजीराजे यांनी सखन पंडिताकडून "बालबोध मुक्तावली" तयार केली, हे भाषांतर इसापनीतीचे होते· "बोध-उपदेश" हा हेतू दिसतो· "पंचतंत्र" (1815) राजा प्रतापादित्याचे चरित्र (1816) वैजनाथ पंडिताने संस्कृत भाषेतून "सिंहासन बत्तीशी" (1824) हे कथासंग्रह मराठीत आणले· बापू छत्रे यांनी इसापनिती कथा (1828) हे भाषांतर केले तर सं·का·छत्रे यांनी "वेताळपंचविशी" "बाळमित्र" लिहिले· विष्णूशास्त्री बापटांनी "नीतिदर्पण" "बालोपदशेकथा" हे ग्रंथ लिहिले·

आज लोकप्रिय झालेल्या लघुकथेचे तंत्र प्राचीन काळाच्या कथेला माहित नव्हते· तरीसुध्दा सरोजिनी बाबर म्हणतात त्याप्रमाणे त्याकाळचे कथेचे स्वरूप लघुकथेच्या नवीन तंत्राच्या दृष्टीने अगदी अस्सल होते याचा पडताळा इसापनीती, पंचतंत्र, हितोपदेश यामधील कथांवरून घेता येतो·

मानवाने अनुभवलेल्या भावविश्वातील जीवनानुभव हेच कथेचे आश्रयविश्व असते· कल्पनाविश्वात रमण्याची हौसही मानवाला कधीच विसरता आली नाही· मनात उद्भवलेल्या भावनेला कल्पकतेचे अद्भूतरम्य रंग चढविण्याची किमयाही मानवाला

आकर्षित करते आणि त्याने केलेल्या रचनेतून विचाराच्या मांडणीत कथा जन्म घेते· त्यामुळेच कथा "होमर व्हर्जीलसारख्यांच्या एलियड-ओडिसीमधून अगर व्यास-वाल्मिकींच्या महाभारत-रामायणातून आपले पद्य स्वरूप, बायबलच्या जुन्या नव्या करारातून गद्यस्वरूप, पंचतंत्र, हितोपदेश, इसापनीति वगैरेतून बोधस्वरूप ठकसेन राजपुत्राच्या व बिरबल आणि बादशहाच्या गोष्टीतून चतुरस्वरूप, लावण्या, पोवाडे, क्रॉनिकल्स, बॅलेड्स वगैरेतून आपले रंगेल मर्दानी स्वरूप वेळोवेळी निरनिराळ्या समाजस्थितीला हरत-हेने आतापर्यंत पटवून दिलेले आढळून येते·"[7]

अगदी सुरुवातीला कथा देवादिकांच्या तसेच उच्च कोटीतील लोकांच्या पराक्रमावर लिहिलेल्या आढळतात व या कथा अद्भूतरम्य घटनांवर आधारित असत· बहुतेक कथांतून बोधवादांचा व तात्पर्याचा पुरस्कार केलेला असे· इंग्रजी राजवट सुरु झाल्यानंतर बदलत्या कालमानानुसार कथेचे अंतरंग व बहिरंग पार बदलून गेलेले आढळते· इंग्रजांच्या राज्याबरोबरच शिक्षण, साहित्य, राजकारण, समाजकारण व मानवी जीवन याकडे पाहण्याचा दृष्टिकोणही बदललेला आहे· आज वास्तव जीवनानुभवाला अधिक महत्त्व आले आहे व हे वास्तव जीवनानुभव मांडत असताना घटनाप्रसंगाबरोबर मनोविश्लेषणावरही सूक्ष्म-अतिसूक्ष्मपणे भर दिला जात आहे· त्यामुळे आजची कथा अंतर्बाह्यदृष्ट्या वाचकांच्या मनाचा वेध तर घेतेच पण त्याला अंतर्मुख केल्याशिवाय रहात नाही·

आज मानवी मनाचा कल बहिरंगापेक्षा अंतरंग वर्णन करण्याकडे झुकू लागला आहे· थोडक्यात सांगायचे म्हणजे - "मराठी मनाचा मोहरा हा पारमार्थिकाकडून ऐहिकाकडे वळत गेला· मानवी मूल्येच त्यामुळे वेगळी झाली व त्याचा परिणाम स्वाभाविकच साहित्यावर होत गेला·" एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वच वाङ्·मयप्रकार आशय, विषय, अभिव्यक्तीच्या दृष्टीने अमूलाग्र बदलत गेले· निबंध, नाटक, कादंबरी, कविता आणि कथा या सर्व वाङ्·मयप्रकारांनी अगदी नवीन स्वरूपे धारण केली· परकीय भाषेतील वाङ्·मयाची भाषांतरे, रूपांतरे व त्याचबरोबर नवनिर्मितीही होवू लागली·

इ·स·1920 पावेतो वेगवेगळ्या कथाकारांनी कथाविश्वात नवनिर्मितीची भर घातली आहे· उदा·हरिभाऊ आपटेंच्या कथांनी आपली लोकप्रियता प्रस्थापित केली होती· त्यामुळे आपोआपच कथाविश्वात विकासाच्या पाऊलखुणा उमटू लागल्या होत्या· रवींद्रनाथ टागोर, ओ·हेन्री, मोपाँसा, चेकॉव्ह इत्यादी लेखकांचा आदर्श गिरवून दिवाकर कृष्ण, फडके, खांडेकर, दाँडेकर, मांजरेकर वगैरे लेखक आपल्या कथा लिहीत होते व त्यामुळे कथावाङ्·मयाचे क्षेत्र विस्तारू लागले होते· या कालखंडात कथा अधिक कलात्मक, आटोपशीर होत गेल्याचे दिसून येते· ती जिव्हाळ्याची, वास्तव व संयमी होत गेल्याचे प्रकर्षाने जाणवते· या काळात कथा भावनेला स्पर्श करणारी, नव्या पिढीचे विचार सांगणारी अशी झालेली आढळते· या काळातील कथेने आपली पार्श्वभूमी ही राजापासून रंकापर्यंत विश्वाला व्यापून टाकले· या काळात कथेला नवे रूप येण्यात अनेक लेखकांचा हातभार लागला· कथेला नवे स्वरूप येण्यासाठी दिवाकर कृष्ण, फडके, चोरघडे, सरदेसाई, य·गो·जोशी, माटे, ठोकळ, व्हटकर, दिघे, पाटील आदि लेखकांनी आपली शक्ती वेचली आहे· या संदर्भात स्त्रियांच्या कथालेखनानेही कथा विकासाच्या कार्यात केलेले योगदान विशेष उल्लेखनीय आहे, यात शंका नाही· या संदर्भात स्त्रियांच्या कथेचा विचार करताना प्रारंभ आढळून येतो तो सौ·आनंदीबाई शिर्के[9] यांच्या कथेपासूनच होय· नंतर विभावरी शिरूरकर, आनंदीबाई साने, पिरोजकर, छाया दातार, लीला श्रीवास्तव, पद्‌मजा फाटक अलिकडच्या ज्योत्स्ना देवधर, शकुंतला गोगटे, मोहिनी वर्दे, शैलजा राजे इ·स्त्रीलेखिकांचे योगदानही महत्त्वाचे ठरते·

कथा वाङ्·मयाची वाटचाल इ·स·1885 पासून "करमणूक" मासिकातून हरिभाऊ आपटेंच्या कथा प्रसिध्द होऊ लागल्या· त्यांच्या दीर्घ कथा या छोट्या-छोट्या कादंब-याच· त्यात पाल्हाळ, पुनरावृत्ती, रचनेची ढिलाई इ·दोष जाणवतात· दिवाकर कृष्ण, फडके, खांडेकर माडखोलकर, पु·य·देशपांडे आदि मंडळींनी कलावादी, जीवनवादी, ध्येयवादी दृष्टिकोन अभिप्रेत धरून लेखन केले· आपल्या साहित्यात काय आहे, त्यापेक्षा कसे असावे याकडे अधिक लक्ष दिले· बोधवाद आणि आदर्शवाद यांचे एक विचित्र मिश्रण त्यांच्या कथांतून आढळते· याचवेळी "फडके यांनी कथेला कादंबरीच्या जाचातून सोडविले तिला सुबक असे रूप दिले·"[10] या काळातील लेखक मंडळी बहुधा सुशिक्षित

असत व ही मंडळी संपादक असत· यांच्या लेखनावर इंग्रजी साहित्याचा परिणाम होता हे कथेचे युग "ब्राह्मणी युग" म्हणता येईल· त्यांचे प्रश्न, दुःख, अडचणी आल्या त्यामुळे ते साहित्य एकांगी राहिले·

स्वतंत्र कथारचनेचा हेतू मनात धरून लिहिलेला मराठीतील पहिला कथासंग्रह म्हणजे "वैजनाथ कलानिधी" हा भारतीय विद्याभवन मुंबई यांच्या विद्यमाने छापला गेला असून वैजनाथ नावाच्या लेखकाने रचला आहे किंवा त्या नावाच्या कोणा माणसाच्या ग्रंथातील त्याच्या मालकीचा ग्रंथ आहे·"[11] भारतात 19 वे शतक संपेपर्यंत सार्वत्रिक लेखन-वाचन परंपरा प्रत्यक्षात आलेली आढळत नाही· 19 व्या शतकाच्या प्रारंभी आलेल्या मुद्रण यंत्रामुळे आणि इंग्रज सरकारच्या ठराविक प्रकारच्या सार्वत्रिक शिक्षणविषयक धोरणामुळे लेखन-वाचन परंपरा येथे रूजली आणि पुढे शिक्षण = लेखन - वाचन असे समीकरण होत गेले· पुढील काळात परंपरेच्या अनुभवातून आलेले शिक्षण म्हणजेच शहाणपण गौण होत गेले आणि नागर व ग्रामीण अशा सीमा दृढ होत गेल्या· लोकपरंपरा ती ग्रामिण आणि नागर जीवन ते आधुनिक अशा कल्पना निर्माण झाल्या व पुढे पुढे ग्रामिणाशी संबंध दुरावत गेले· 19 व्या शतकाच्या अखेरीपर्यंत ग्रामीण व नागर या समजुती रूढ होत गेल्या· शहरी जीवन आणि ग्रामीण जीवन ह्यात फारकत होत गेली· - "वस्तुतः मानवी जीवनानुभवाच्या मुळाशी त्याचे पिढयान्‌पिढ्यांचे सांस्कृतिक संचित अनेकांगांनी उभे असते, त्याचे येथे विस्मरण झालेले दिसते" हे डॉ·तारा भवाळकरांचे निरीक्षण येथे विचारात घेण्यासारखे आहे·

इंग्रोजोत्तर काळात मराठी वाड्·मयाची जी निर्मिती झाली ती इंग्रजी साहित्याच्या प्रभावातून व अनुकरणातून झाली तसेच नवजीवनाच्या बदलत्या मूल्यातून झाली हे खरे असले तरी येथील पूर्वपरंपरेशी असलेला संबंध कोठे राहिला का नाही, हे कथा-वाड्·मयाच्या माध्यमातून लक्षात घेणे आवश्यक ठरते· मुद्रित साहित्याचे पर्वूपरंपरेशी असलेले नाते तोडूनच पुढील वाड्·मयनिर्मिती झाली की काय हेही येथे तपासून घेणे आवश्यक ठरते· मराठी कथासाहित्यापुरते बोलायचे तर इंग्रजोत्तर काळात जुन्या-नव्याचा योग्य-अयोग्यतेचा संघर्ष डोळ्यात भरतो· साहित्यामध्ये नवीन जे जे आले

ते पूर्वपरंपरेचा नाळ तोडूनच आले असा भाव वाड्·मयइतिहासकार आणि समीक्षक यांच्यात काही काळ मोठा प्रबळ दिसतो· अलिकडे मात्र ही दृष्टी बदललेली आढळते·

कथावाड्·मयापुरते सांगायचे झाले तर पूर्वपरंपरेतील लोककथेशी नव्या इंग्रजोत्तर कथावाड्·मयाचे नाते फार क्षीणपणे आढळते· तथापी कथात्मकता हा गाभा कथा, कादंबरी, नाटक, खंडकाव्य, महाकाव्य अशा अनेक वाड्·मयप्रकारात आहे· या कथास्वरूप वाड्·मयाची रूपे भिन्न आहेत, बदललेली आहेत हे मान्य करूनही कथात्मक साहित्याची ही व्याप्ती आहे हे मान्य करावे लागेल· इंग्रजोत्तर वाड्·मयाचे स्वरूप विषय-आशय-अभिव्यक्तीच्या दृष्टीने बदललेले आहे हे खरे परंतु कथावाड्·मयाचे लोकपरंपरेशी काही नाते आहे का ? या नात्याचे स्वरूप कोणते ? हे शोधण्याचा येथे प्रयत्न केला आहे, त्या अनुबंधाच्या काही दिशा येथे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे· कोणतेही नवे जेव्हा येते तेव्हा पूर्वपरंपरेचे संपूर्ण नाते ते कधीच तोडू शकत नाही· पारंपारिक भाषेत सांगायचे तर - "शेण जमिनीवर पडले की ते माती घेवूनच उठते" मराठी साहित्यापुरते एवढे स्पष्टीकरण पुरेसे आहे· भाषेसंबंधी कथात्मक साहित्याबाबत बोलायचे म्हटले तर भाषेत मानवी जीवनाच्या पिढयान् पिढ्यांचे अनुभव व सांस्कृतिक संचित सामावलेले असते· समूहमन आणि व्यक्तिमन भाषेतूनच व्यक्त होत असते· याशिवाय समाजाच्या चालीरिती, रूढी, समजुती भाषेतूनच व्यक्त होत असतात·

अनुभवाच्या अभिव्यक्तीचे अनेक प्रकार समाजात रूजलेले असतात· ते सगळे एकदम नाहिसे होत नाहीत ते बदलून नव्या रूपात अस्तित्वात येत असतात· कथा-वाड्·मयाच्या संदर्भात मौखिक परंपरा लिखीत रूपात अवतरताना असेच काहीसे होत असते·

### कथेचा बोध हेतू

लौकिक जीवनाची समृध्दी, सुख, शांती, व्यक्तीचे आणि समाजाचे नैतिक आचरण, कुटुंब आणि समाजासाठी बोध देणे हे कथेचे कार्य प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कार्य समजले जाते· जीवनातली विसंगती विरूपता, नाहिसे करून जीवन सुखी व्हावे,

जीवनाला योग्य मार्ग सापडावा म्हणून वेगवेगळ्या विनोदी कथा, चातुर्य कथा, भारुडे, चुटके, म्हातारीच्या कथा आपल्या समाजात इंग्रजोत्तर काळातही सांगितल्या गेल्या. यावरून दीर्घकाळ कथासाहित्य बोधवादी राहिलेले दिसते. ही प्रथा लोकपरंपरेतल्या प्रदीर्घ कथापरंपरेतूनच प्रवाहित झाली असावे असे वाटते. तथापी पूर्वीचे कथेतील बोधाचे स्वरूप फार ढोबळ होते आणि आजच्या प्रगल्भ कथात्मक साहित्याचे बोध-स्वरूप अधिक अंतर्मुख करणारे अंतर्बाह्य जीवन समृध्द करणारे आहे, असे वाटते.

समाजाला आणि व्यक्तीला मार्गदर्शक ठरणारी सूत्रे कथावाङ्मयातून सातत्याने व्यक्त होत गेलेली आढळतात. उदा. वि.स.खांडेकर यांच्या रूपक कथा, लघुनिबंध, स्फूटकथा इ. मराठी नियतकालिकांनी कथावाङ्मयाच्या विकासाला हातभार लावला आहे. "करमणूक" मासिकांनी सुशिक्षितांच्या मनाची पकड घेतली. इ.स.1885 चा हा काळ होता. "काळ तर मोठा कठीण आला" ही हरिभाऊ आपटेंची कथा ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवते. अशा वास्तववादी कथांचे लेखन यापूर्वी कोणी केले नव्हते. या कथेने हरिभाऊंना प्रचंड लोकप्रियता मिळाली आणि ते कथावाङ्मयाचे शिल्पकार बनले. याच काळात मराठी कथा आपले पाय रोवू लागली आणि याच कालखंडाच्या अखेरच्या टप्प्यावर दिवाकर कृष्णांच्या कथेने कथेला नवे वळण लावले. पूर्वीची "श्रवणीय" गोष्ट आता "वाचनीय" झाली, लघुकथा बनली."[13]

इ.स.1926 नंतर मराठी लघुकथेचे आवर्तन सुरू झाले. कथेचा प्रारंभ, शेवट, कथेचा आकार, कथेची शैली, सुसंवाद, वाक्यरचना ह्या बाह्य रूपाबरोबर मनातील भावच्छटा, वर्णन कुशलता, अर्थघनता, काव्यमय अनुभूतींचे गहिरे दर्शन, तंत्रकौशल्य, सामाजिक जाणीव या सर्व बाबींचा कथेत आविष्कार झाला. इ.स.1885 ते 1915 हा लघुकथा विकासातील पहिला टप्पा आहे. या काळाला "करमणूक" कालखंड म्हटले गेले. कारण करमणूक मासिकातून कथालेखन होवू लागले. यानंतरचा "मनोरंजन" कालखंड. हा लघुकथा लेखन विकासातील दुसरा टप्पा मानला जातो. आशयविषयक आणि तंत्रविषयक असे दोन बदल या काळात लिहिल्या गेलेल्या कथेत घडून आले.

## कथाविकासाचा पहिला टप्पा

ह·ना·आपटे : यांनी कथेला स्वतःचे असे दालन निर्माण करून दिले· त्यांच्याच प्रयत्नामुळे कथा वास्तवाभिमुख बनली आणि समाजाच्या सुखदुःखाशी समरस होवू लागली· आधुनिक मराठी लघुकथेच्या रोपाचे प्रथम बीजारोपण "करमणूक" मासिकातून झाले· हरिभाऊंची स्फूट गोष्ट ही आजच्या कथेचे प्रारंभिक स्वरूप· पाल्हाळाची तिला गोडी आहे· नीतिबोधाची तिला विलक्षण हौस आहे· "मध्यमवर्गीय समाजाचे सूक्ष्म व सहानुभूतीपूर्ण निरीक्षण आणि समाजहिताबद्दलचा जातिवंत जिव्हाळा या गुणविशेषांमुळे हरिभाऊंची स्फूट गोष्ट रंजक आणि परिणामकारक झाली·"[14] दीर्घकथेची बीजे हरिभाऊंच्या "काळ तर मोठा कठीण आला" या ग्रामीण जीवनावरील कथेत सापडतात· या कथेत बोध आणि कला यांचा सुंदर समन्वय साधला आहे· इ·स·1920 पर्यंतचा कथावाङ्·मय प्रकाराच्या विकासाचा पहिला टप्पा मानला जातो·

कृ·अ·एकबोटे : यांची कथा बोधप्रवण आहे पण हरिभाऊंच्या कथेइतकी ती सरस नाही· गतिशून्य कथानक आणि निर्जीव व्यक्तिदर्शन यामुळे त्यांच्या कथेचा दर्जा खालावतो·

## कथाविकासाचा दुसरा टप्पा

हा टप्पा 1915 पासून सुरु होतो· कथेत आशयविषयक आणि तंत्रविषयक बदल येथून पुढे जाणवू लागला· स्त्रीजीवनविषयक उदार विचार व्यक्त होऊ लागले· उदारमतवादाला उत्तेजन मिळू लागले· पाल्हाळ कमी होऊ लागले· नीतिबोधाचे प्रस्थ कमी कमी होवू लागले·

वि·सी·गुर्जर : यांची कथा बंगाली कथावाङ्·मयाच्या परिशीलनावर पोसलेली आहे· रंजनप्रधान कथा लिहिल्या· संविधानकात्मकतेवर भर दिला आहे· डॉ·अ·ना· देशपांडे म्हणतात, "लघुकथा या अभिधानाशी सुसंगत असा रचनेचा साक्षेप तिच्या अंग-प्रत्यंगातून थोड्याफार प्रमाणात दृग्गोचर होऊ लागला· या द्विविध परिवर्तनाचे उत्तम उदाहरण म्हणजे वि·स·गुर्जर यांची कथा·"[15]

**वि·स·खांडेकर** : हे स्वतःच आपल्या कथालेखनाची वैशिष्ट्ये सांगतात· "रंजकता, नर्मविनोद, भाषेचे लालित्य, एखादे रहस्य ठेवून उत्कंठा वाढविण्याचे कौशल्य,

**दिवाकर कृष्ण** : यांची कथा व्यक्तिदर्शनप्रधान होऊ लागली· कथेला कलात्मकतेच्या प्रगत अवस्थेत आणण्यात दिवाकर कृष्णांनी मोलाचे कार्य केले· "रूपगर्विता", "समाधि आणि इतर गोष्टी" या कथा वाचताच त्यावेळेपर्यंत कलात्मक सौंदर्याचा सुंदर साज मराठी लघुकथेवर चढवला· प्रतिभेचा स्पर्श होताच ती उत्कटतेने रसनिर्भर झाली· पहिल्या संग्रहात तिची वृत्ती करूणार्द्र दिसते·

मराठी कथेला आता शंभर वर्षे उलटून गेली आहेत· हरिभाऊ आपटेंच्या मागोमाग कृ·के·गोखले, वि·सी·गुर्जर, ह·ना·आपटे, क्षमा राव, कमलाबाई टिळक, कितीतरी लेखिकांनी मराठी कथा समृध्द केली· नंतर वि·स·खांडेकर, ना·सि·फडके, य·गो·जोशी, वि·वि·बोकील, चि·वि·जोशी, लक्ष्मणराव सरदेसाई वगैरे लेखकांनी लघुकथा कलापूर्ण, रंजक अशी बनवली तर वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे अशा त्यापुढील काळातील कथाकारांनी लेखनात काव्यात्मकता, अन्तर्मुखता आणली· 1940 सालचे पुढे प्रकाशित होणा-या नवकथेची ही पदचिन्हच होती· "1945-47 पासून आकारात येत गेलेल्या नवकथेचे लेखक शशिकांत पुनर्वसु, बी·रघुनाथ, पु·भा·भावे, दि·बा·मोकाशी, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, शांताराम पुरोहित, व्यंकटेश माडगूळकर, यात नवकथेचे मुख्य मानकरी प्रमुख शिल्पकार गंगाधर गाडगीळ रास्तपणे मानले जातात·[16] §त्यांची पहिली कथा "प्रिया आणि मांजर§·

1920 च्या आसपास लघुकथेच्या विकासाच्या वाट्याला नवा उत्साह आल्याचे दिसते· अनेक कथाकार उत्साहाने लिहू लागले· प्रादेशिक कथांची शाखा याच सुमारास टवटवीत दिसू लागली· वि·स·सुखटणकरांचा "सह्याद्रीच्या पायथ्याशी" हा कथासंग्रह लिहून गोमंतक - कालचे व आजचे आपल्यापुढे आणले· सुखटणकरांच्या कथांची वीण जुन्या वळणाची असली तरी रसाद्रतेमुळे व भरपूर प्रसंगनिष्ठेमुळे ती आकर्षक झालेली आहे· लक्ष्मणराव सरदेसाई यांनीही "मायेचा वारसा", "ढासळलेले बुरूज", "मोडलेला माड" या कथातून गोमंतकीय जीवन उभे केले·

खांडेकरांनी व्यक्तीच्या नाजूक भावभावना व सूक्ष्म सुखदुःखे काव्यात्म रीतीने प्रकट करूनही सामाजिक सुखदुःखाकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांच्या कथातील आत्म-निवेदनातील प्रांजळपणा अभिनंदनीय असतो. त्यांच्या कथावैशिष्ट्याविषयी डॉ.अ.ना. देशपांडे यांचे खालील विधान पटण्यासारखे आहे. "भावविवशता हे खांडेकरांच्या प्रकृतीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या भावविवशतेनेच त्यांना प्रश्नार्थक स्वरूपाचे सामाजिक कथा लिहिण्यास स्वभावतःच असमर्थ बनविले आहे ही त्यांची भाबडी भावुकता, त्याचबरोबर प्रसंगांच्या गुंफणीत, कथानिवेदनाच्या पध्दतीत व भाषासरणीत चमत्कृती उत्पन्न करण्याची त्यांची बालिश हौस ही सगळी सामुग्री कोणत्याही सामाजिक प्रश्नाचे वास्तव दर्शन घडू देण्यास सर्वस्वी प्रतिकूल आहे."[17]

<u>ना.सि.फडके</u> : ना.सि.फडकेंच्या कथालेखनाचा नजरेत भरणारा विशेष म्हणजे विपुलता आणि विविधता. ब-याच कथांतून बरेचसे सूचक, कलात्मक आणि परिणामकारक व्यक्तिदर्शन साधलेले आहे. "शांता", "तुरूंगातून सुटका", "गुलामाचं राज्य", "सात रूपये दहा आणे", "माणूस जगतो कशासाठी" या कथा उल्लेखनीय आहेत. फडकेंच्या काही कथा उघड उघड बोधवादाला आणि विशिष्ट मतांच्या प्रचाराला वाहिलेल्या आहेत. "सूक्ष्म व प्रभावी व्यक्तिदर्शन करण्याच्या बाबतीतले फडकेंच्या लेखणीचे सामर्थ्य फारच मर्यादित आहे. उदा."द्रोह" ही कथा पाहण्यासारखे आहे.

"रचनेतील टापटिपीचे अगत्य, गोड अधिरता उत्पन्न करणारे व विस्मयाच्या नाजूक नी सौम्य हुलकावण्या देणारे रहस्य आणि भाषासरणीतील गुळगुळीत लालित्या या तीन गोष्टींवरच मुख्यतः त्यांच्या रंजनपर कथेचा नोकझोक नी डामडौल आधारलेला आहे."[18] रचनाचातुर्याने नटलेली व रंजनावर भर देणारी कथा लिहिण्याचा प्रयत्न वि.सी.गुर्जरांनी केला. पण या प्रयत्नातून पुढे जाणीवपूर्वक अधिक नीटस्, अधिक रेखीव व आकर्षक रूप फडकेंनीच प्राप्त करून दिले.

श्री.दा.न.शिखरे यांनी फडकेंच्या कथाविषयी म्हटले आहे - "पाल्हाळीक वर्णन किंवा अरसिक विवेचन हे दोष वगळले तर फडक्यांची लघुकथा नाकीडोळी नीटस आहे आणि तिचे इतर अवयवही सुंदर आहेत, यात शंका नाही. कथेचा आरंभ चित्तवेधक

असणे जितके आवश्यक, तितकाच तिचा शेवट विस्मयकारक असणे अगत्याचे असते·"[19] भाषेचा सहजपणा कथेसाठी महत्त्वाचा असतो म्हणजे कथेची भाषा किती सोपी व सहज असावी याचाही नमुना फडक्यांच्या "वत्सला" कथेत पहायला मिळतो· आपल्यासमोर जे जीवित घडत आहे त्यातच समरस होऊन व त्यांचे चिकित्सक दृष्टीने निरीक्षण करून लिहावयाची योग्य दिशा टाकून लिहिलेल्या सर्व वाङ्·मयाची हीच कथा असावयाची" असा संदेश "दृष्टिआडची सृष्टी" इ·कथातून फडके यांनी दिला आहे· तो भावी कथालेखकांना गुरुमंत्रासारखा महत्त्वाचा वाटण्याजोगा नाही काय ?

ललित भाषाशैली, रम्य कल्पना आणि समाजहिताचा प्रचार या त्रिगुणांनी नटलेल्या वि·स·खांडेकरांच्या कथा मराठीला भूषण झाल्या आहेत· त्यांच्या काही कथा सूक्ष्म मनोविश्लेषण करणा-या आहेत· "वाचकांच्या चित्ताला एखाद्या करूण भावनेचा स्पर्श करून जाणा-या काही कथा संस्मरणीय आहेत· उदात्त विचार, तेजस्वी कल्पना, रमणीय उपमा यामुळे त्यांची कथा मनावर ठसते· वाचकांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणा-या ब-याच कथा त्यांनी लिहिल्या· समाजातील विषमतेचे दारूण स्वरूप दोन-चार फटका-यांनी सहजपणे भेदकतेने त्यांनी रंगविले आहे·"[20] "दोन भास" कथेत समाजातील विषमतेच्या दरीची कल्पना आणून दिली आहे· कथेतून बोधप्रद व कलापूर्ण कौटुंबिक चित्र खांडेकर रंगवतात ते अगदी साध्या, सरळ भाषेत· जवळ जवळ य·गो·जोशींच्या पध्दतीने त्यात खोट्या उपमांचे रबरी फुगे नाहीत, कल्पनेची फुलपाखरे नाहीत· य·गो·जोशींची कथा करूणरसाने ओथंबलेली असते. साध्या, गरीब, मध्यमवर्गीय कुटुंबातील अगदी सामान्य घडामोडी घेवून कथा रचतात· उपरोधिक लिहिण्यात त्यांचा हातखंडा आहे· सहजता हा त्यांच्या कथेचा आत्मा आहे· भाषा साधी, सोपी, सरळ, नित्याच्या व्यवहारातले दाखले देतात· "दुधाची साय" "शेवग्याच्या शेंगा" या प्रसिध्द कथा ना·सि·फडके व य·गो·जोशी यांना सांधणारा पूल म्हणजे वि·स·खांडेकर·

फडके-खांडेकर यांच्या बहुसंख्य कथांमधून हळवे, भावुक, रोमँटिक, स्वप्नरंजन असे· कथा बहुधा दुःखपर्यवसायी असत आणि त्या प्रेमभंग, मृत्यू यामुळे घडत· या दुःखाचेही अतिरंजित भावविवशतेने थबथबलेले चित्रण त्यात असे· तत्कालीन

कथात उद्‌गारचवाचक चिन्हांचा वापर बराचसा असे. काही कथांतून सामाजिक किंवा राजकीय उद्‌बोधनावर भर दिला जात होता. समाजसुधारणा, देशभक्ती, जातीय विषमता, गरिबी-श्रीमंतीतला संघर्ष, स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार, निराधार स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःखभोग हे आणि यासारखे इतर विषय बहुतेक कथांतून हाताळले जात. "स्वप्नरंजनासाठी ऐतिहासिक घटना आणि वातावरण यांचाही आश्रय घेतला जाई. कथानकाप्रमाणे शैलीचेही संकेत ठरलेले होते. अलंकारिकतेवर बराचसा भर दिला जात असे. बहुतेक कथांमध्ये व्यवस्थित बेतून केलेले पूर्वनियोजन असे, म्हणजेच कथा रचल्या जात होत्या.[21]

<u>य.गो.जोशी</u> : कथेचा आशय स्वाभाविकपणे एका सहज आंतरिक अपरिहार्यतेमुळे फुलत जावा याचे अवधान फार मोजक्या लेखकांना असते. य.गो.जोशी कथांतून प्रतिमांचा वापर करत. तर दिवाकर कृष्णाचा कल बाह्य घटनांऐवजी त्यांना प्रेरक होणा-या गूढ आणि मानसिक पातळीवरच्या व्यामिश्रतेचे चित्रण करण्याकडे असे. एरव्ही निखळ कलात्मक आनंद आणि समाधान देणा-या कथा लिहिणची प्रवृत्ती सहसा आढळत नसे. य.गो.च्या कथेत कौटुंबिक भावना अत्यंत जिव्हाळ्याने रंगवलेल्या आढळतात. "शेवग्याच्या शेंगा", "वहिनीच्या बांगडया", "दुधावरची साय", "सुपारी" या कथा सोज्वळ, सात्विक कौटुंबिक भावना फुललेल्या व्यक्तीचे चित्रण त्यांच्या कथांत येते. या पात्रांबद्दल त्यांना आत्मीयता वाटते. काही कथांतून दुःखाची अत्यंत सहृदयतापूर्वक मीमांसा केलेली आढळते. "जोशांची कथा बंदिस्त नाही. तिचे स्वतःचे असे वेगळे तंत्र आहे. त्यामुळे त्यांची कथा परिणामकारक आणि जिवंत झालेली दिसते तिच्या अंगी सहजतेची लज्जतही आलेली आहे.[22]

<u>वि.वि.बोकील</u> : यांचे लेखन गोष्टीवेल्हाळवजा आणि उपहास प्रवणही आहे. विशिष्ट जीवनमूल्यांवर त्यांची निष्ठा आहे. "वळवाचे पाऊस", "जखम", "माती", "कोडाची मुलगी" करुणरसनिर्मितीस त्यांची लेखणी निष्प्रभ ठरते.

<u>द.र.कवठेकर</u> : करुण रसाची हृदयस्पर्शी जाणीव करून देण्यात कवठेकर सिध्दहस्तच त्यांच्या कथांत तांत्रिक कारागिरी नसूनसुध्दा केवल रसार्द्रतेमुळे त्या परिणामकारक झाल्या आहेत. डॉ.अ.ना.देशपांडे म्हणतात, "ज्या भावव्याकुल वृत्तीच्या बळावर

त्यांनी आपल्या कथा मनोवेधक बनविल्या आहेत· तिच्याच अतिरेकामुळे मात्र ब-याच वेळा त्यांच्या कथांचे कलात्मक मोल कमी झाले आहे·"[23] "तिळाच्या वडया" "ते निदर्य नाहीत ग।", "अंध अंधारी बैसले" या कथा वाचल्यावर करूणरसाची हृदयस्पर्शी जाणीव करून देण्यात कवठेकर सिध्दहस्त असल्याचे पटते·

अनंत काणेकर : "रक्ताची खूण", "प्रेमाचा मोसम" हे कथासंग्रह प्रसिध्द, त्यांच्या कथांत भावना व बुध्दी यांना वाव दिलेला आहे· सुरुवातीला कल्पनावादात रमणारी त्यांची लेखणी पुढे व्यक्तिचित्रणे यथार्थपणे दाखवते· त्यांच्या कथांतून मानवी स्वभावातील वैचित्र्याचे अत्यंत आटोपशीर, चटकदार व मार्मिक पध्दतीने चित्रण केलेले आढळते·

कथालेखनाचा तिसरा टप्पा : 1926 ते 1945

या कालखंडात कथांतून बरेच नवीन नवीन विषय हाताळले गेले· समाजचित्रणा-बरोबरच स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण, देशाविषयीची तळमळ, त्यागबुध्दीने दुःखे सहन करणा-या दुर्दैवी स्त्रियांची करूणाजनक चित्रेही आढळतात· काही कथा व लेखक

-

पु·ग·सहस्त्रबुध्दे : "लपलेले खडक" यातून आजच्या सुशिक्षितांच्याही सामाजिक जीवनात स्त्रीविषयक व इतर सामाजिक अन्यायाचे खडक लपून बसले आहेत· याची जाणीव करून दिलेली आहे·

वि·ल·बर्वे : "कलमी आंबे", "कोवळी पोफळे" इ·या कालखंडात शं·दि· करंदीकर, रा·न·कीर्तने, ना·वि·कुलकर्णी, अ·म·जोशी, द·मो·दामले, प्र·तु·दिघे, के·मु·नाडकर्णी, ग·कृ·फाटक, ग·रा·बाळ, वि·वि·भिडे, गो·रा·माटे, उ·मि·राऊत, चि·ल·लेले, वि·वा·हडप, ह·ब·अत्रे, बा·ज·कुंटे, श्री·रा·मराठे, वि·शि·साळवी, दा·न·शिखरे इ·कथालेखिकांनी कथालेखन करून मराठी कथावाङ्·मयाचे दालन समृध्द करण्यात मोलाची भर घातली· श्री·म·माटेंच्या कथा तर इतक्या हृदयस्पर्शी त्या आजही वाचकाचे मन हेलावून सोडल्याशिवाय रहात नाहीत· दीन-दलितांची दुःखे शंकरराव खरात, माटे यांनी वेशीवर टांगली· "सांगावा", "माणुसकीचा गहिवर"

हे कथासंग्रह खूप गाजले·

वामन चोरघडे : मराठी लघुकथेला कथानकाच्या काचातून मुक्त करण्याचे श्रेय त्यांना देण्यात आले आहे· काव्यात्मकता आणि चिंतनशीलता ही चोरघडेंच्या कथांची वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनात कोवळेपणा आहे· अपरिपक्वता व आभासमयता आहे· "रानबोरीचा पाटील"मधील लक्ष्मी, "समुद्राचे पाणी"मधील भाऊ "घर"मधील लीला, "क्रव्याद"मधील बलुची तरुणी इ·पात्रे यांच्या माध्यमातून दुःखी दुर्दैवी जीवनाबद्दल त्यांना वाटणारा कळवळा व्यक्त झालेला आहे· अ·ना·देशपांडे म्हणतात, "लोककथा वाङ्·मयाचे ते रसिक अभ्यासक असून त्या अभ्यासाचा उपयोग करून अन्नाची भूक ही मानवाची आद्य गरज आहे· उदात्त जीवनमूल्यांचे अनुसरण ती भागल्याशिवाय करणे अशक्य आहे· चोरघडेंची सामाजिकतेची जाणीव बरीच अस्पष्ट आहे· विनोद दृष्टी ओबडधोबड आहे· जीवनातील उग्रतेपेक्षा भयानकतेपेक्षा, भव्यतेपेक्षा सौम्यतेचे हळुवार हातांनी चित्रण करण्याकडे या लेखकाच्या प्रतिभेचा ओढा जास्त आहे·"[24]

र·वा·दिघे : ग्रामीण जीवन विशेष करून यांच्या कथेत आढळते· आपल्या कथांवर अद्भूततेचा व कल्पनारम्यत्वाचा सुंदर साज चढवला आहे· विनोदी व्यंग्यचित्रे रेखाटण्यातही दिघेंचा हातखंडा आहे· "वाकडेवाडीचा गावगुंड" सर्वांच्या परिचयाचा आहे· "जगू" नावाच्या शेतक-यावर 'पहिले बक्षीस' ही कथा लिहिली· निष्पाप वृत्तीची माणसे, नीच व कुटिल वृत्तीच्या माणसांच्या जाळ्यात सापडल्यावर नाश पावतात· ही कटू व करूण वस्तुस्थिती यांचे प्रभावी व प्रत्ययकारी चित्रण करणारी "वादळ" ही कथा प्रसिध्द आहे·

ग·ल·ठोकळ : जनपदाचे अंतःकरण जाणणा-या ठोकळेंनी शक्य असूनही आपल्या कथांतून ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडविण्याच्या बाबतीतच बरेच दुर्लक्ष केलेले आहे· उलट त्या जीवनाचा आधार घेऊन रहस्य कथेत शोभतील असे अवास्तव व भडक चित्रण काही ठिकाणी केले आहे· उदा·"ग्यानबाची मेख" कथेत ग्यानबाच्या बापाच्या प्रेताचा अंगठा कापून आणून तो एक लाखाच्या स्टॅंपवर उठवणे असे अवास्तव प्रसंग·

डॉ·वर्टी, साने गुरूजी, आण्णाभाऊ साठे, मांजरेकर, शंकर पाटील, मिरासदार, अनंत काणेकर, महादेवशास्त्री जोशी, श्री·म·माटे इ·कथालेखकांच्या कथा गाजल्या·

**चौथा टप्पा :**

**नवकथेचे युग**

सुरूवातीची कथा व अलिकडची कथा यामधल्या काळात कथेची खूपच स्थित्यंतरे झाली· "इ·स·1944-45 नंतर गंगाधर गाडगीळ, पु·भा·भावे, अरविंद गोखले आणि व्यंकटेश माडगूळकर यांनी मराठी कथेला नवीन वळण प्राप्त करून दिले· गंगाधर गाडगीळांनी कथेला सर्वांगानी नवे रूप दिले· भावे, गोखले, माडगूळकर यांनी जुन्या कथेच्या जवळ राहून नवतेच्या परिणामांचा अविष्कार केला·"[25] या चार नवकथाकारांच्या कथा खूप गाजल्या· हे चौघे मित्र गप्पागोष्टी करताना एकमेकांच्या कथांबद्दल चर्चा करत· मैफली काव्यशास्त्र विनोदाने रंगवत पुण्यात किंवा मुंबईत फेरफटका मारत जांबोटकरांच्या खोलीवर मनमोकळेपणाने गप्पागोष्टी करत· रात्र साजरी करत··

पं·महादेवशास्त्री जोशी, श्री·ज·जोशी, वसुंधरा पटवर्धन हे कथालेखक बरोबरचे· नंतर विद्याधर पुंडलिक, द·मा·मिरासदार, वि·शं·पारगावकर, मधु मंगेश कर्णिक, शंकर पाटील, तारा वनारसे, सुधा नरवणे यांच्यानंतर शशिकांत पुनर्वसु, पु·भा· भावे, दि·बा·मोकाशी, गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, सदानंद रेगे, अरविंद गोखले हे समकालीन कथालेखक -

**शशिकांत पुनर्वसु :** अरविंद गोखले पुनर्वसुंच्या कथालेखन वैशिष्ट्याबद्दल म्हणतात - "भावविश्वातल्या छोट्या छोट्या लहरींशी समरस होण्यातच त्यांना खरा आनंद वाटतो· एक प्रकारच्या स्वप्नरंजनातच हा लेखक रममाण होतो· प्रेमाचे, संसाराचे स्वप्न आणि त्यातल्या अडचणींचही स्वप्नच।"[26] "शंतनु" "वाटाडया", "शांति" इ·कथातून त्यांना प्रेमाबद्दल स्पष्ट व तीव्र भावना मांडता आली नाही·

**सदानंद रेगे :** "कचकडं", "माझा बाप", "अखेरचा दिवस", "सीझरचे रक्त", "पाळणा" इ· कथा गाजल्या· बहुतेक कथा कारकुनी जीवनातल्या भयानकतेवर,

दारिद्र्यावर, अपेशी व्यक्तींवर, एकाकी मनोव्यथेवर आधारलेला आहेत· त्यांचा पल्लेदार कल्पनाशक्तीला लोकविलक्षणच वेड जडलं आहे· अद्भूत आणि वास्तव एकमेकांत बेमालूम मिसळून गेले आहे· भूत, पिशाच्च, चेटकिणी, प-या प्लँचेट स्मशान, ह्या गोष्टी त्यांच्या कथांतून येतात· मृत्यू तर सतत सावली धरून असतो· अन् तरी बहुतेक कथा "उत्तररात्र", "बर्फ नुसतं बर्फ", "दर्शन" या सुंदर कथांतून रेगेंच्या प्रतिभेचे पैलू दिसतात· इब्सेन, शेक्सपियर, लोर्का, युगीन, ओनील या अभिजात लेखिकांच्या कलाकृती मराठीत आणण्याचे काम रेगेंनी केले·

<u>पु·भा·भावे</u> : "कथापुरूषोत्तम" अशा सार्थ शब्दात अरविंद गोखले यांनी भावेंचा गौरव केला आहे· ते म्हणतात, "भावे साहित्यिक, कथाकार म्हणून मोठा, पुरूष, स्नेही, सहकारी म्हणूनही मोठा माणूस"[27] "सतरावे वर्ष" §1949§, "मुक्ती" §1952§ हे भावेंचे कथासंग्रह· "अभिरूची", "हंस", "सत्यकथा" या मासिकातून भावेंच्या कथा प्रकाशित झाल्या होत्या· "सीमेवर आणि सावल्या" या भावेंच्या कथा तर पुनः पुन्हा वाचण्यासारख्या· चिंतनाचा आवेग व तन्मयता भावेंची कथा व्यक्त करते·

<u>गंगाधर गाडगीळ</u> : सर्वसाधारण वाचक, नवकथालेखक म्हणजे गाडगीळ-गोखले असा जोडीने उल्लेख करतात· गाडगीळ सर्वस्वी नवी पूर्वपरंपरा नसलेली अशी कथा लिहितात· गाडगीळांनी कथेला सर्वांगानी नवे रूप दिले· नवकथेमध्ये घटनांचे प्रसंगाचे आणि एकूण कथानकांचे मध्यवर्ती स्थान ढळले· कथानक हे साध्य न राहता साधन बनले· मानवी मनाचे सूक्ष्म अतिसूक्ष्म व्यापार वासना, विकार यातून जाणवणारे अस्वस्थ, अश्रध्द जीवनदर्शन ही नवकथेची उद्दिष्टे बनली· ही परिणामे गाडगीळांनी जवळ जवळ दोन दशके मराठी वाचकांना दाखविली· "आजच्या उद्ध्वस्त विश्वात वावरणा-या संवेदनशील वृत्तींना खोलवर जाणवणारी विमनस्कता, कटुता, जुगुप्सा, आत्मपिडेची जोरदार इच्छा, उपरेपणाची भावना यांचे नवे रसायन गाडगीळांनी बनविले· "तलावातले चांदण", "बिन चेह-याची संध्याकाळ", "खरं सागायचं झालं तर" या कथांतून संज्ञेची प्रवाही रूपे व्यक्त केली· ते खुबीदार चित्रण करतात· सूक्ष्म संवेदनांची कंपने आविष्कृत करतात·"[28]

<u>अरविंद गोखले</u> : गोखले स्वतः म्हणतात, " माझ्या कथेत जुन्या संकेताच्या व कारागिरीच्या खुणा सहज दिसतात· 1945 साली "कोकराची कथा" ही कथा सत्यकथेत प्रकाशित झाली· इथपासून 1950 पर्यंत त्यांनी शंभरावर कथा लिहिल्या· 1948 मध्ये "मनोहर"ने गोखलेंवर विशेष अंक प्रसिध्द केला· "दिव्य", "मीलन", "सुतक", "झेप", "आमंत्रण", "माहेर" या दृष्ट लागण्यासारख्या कथा प्रसिध्द झाल्या· "मंजुळा", "परीस", "नट", "कराची", "कवडसा" या त्यांच्या गाजलेल्या कथा, गोखल्यांना माणसांच्या सुखदुःखाविषयी विलक्षण आत्मीयता, जिव्हाळा आहे, भक्ती आहे· गोखले चमत्कृतीच्या, विस्मयतेच्या जाणिवेत बुडून जात नाहीत· त्यांच्या ब-याचशा कथा वा-याबरोबर सहजपणे वाहणा-या सुगंधाप्रमाणे अति दूरपर्यंत पोहचलेल्या आहेत· त्यात "विघ्नहर्तो", "मंजुळा", "कातखेळ", "माहेर", "कमळा", "अविधवा", "मुसळधार" इ·कथा पहाण्यासारख्या आहेत· "कथन प्रवृत्तीने त्यांच्या कथांचा जन्म झाला आहे· वाचकाला त्या त्या श्रेष्ठ कथांचा प्रवक्ता बनण्याची ताकद हीच कथांमधून प्रकट झाली हेच गोखल्यांचे सर्वात मोठे यश।"[29]

<u>व्यंकटेश माडगूळकर</u> : "शाळा", "भुताचा पदर", "करूणा" "कराची", "दुसरी दासी", "गाय व्याली" या कथा 1946 नंतर लिहिलेल्या· आज 50 वर्षानींही वाचल्यावर त्या विलक्षण सुंदर वाटतात· "फक्कड गोष्टी", "बाजारवाट", "बाई", "काळी आई", "लग्न" या त्यांच्या गाजलेल्या कथा· "माणदेशी माणसं", "जांभळाचे दिवस", "उंबरठा", "वारी", "घरदार", "हक्काचा पाऊस", "मारुतीराया" "बनगरवाडी" "फक्कड गोष्टी" इ·कथासंग्रह प्रसिध्द झाले· माडगूळकरांनी आधुनिक मराठी कथा सकस व समृध्द केली· वेगळया व्यक्ती, विलक्षण वातावरण, शुध्द शैली, भाषा, माणदेशी शंभर नंबरी साहित्यलेखन , माडगूळकर हा मराठी साहित्यात एक चमत्कार, अवतार जाणवू लागला· "कालगती", "त्याची गाय व्याली", "शाळा" या तीन कथा तर अगदी निराळ्या, निर्दोष अशा नवकथा· भावे-गाडगीळ-गोखले यांच्याबरोबरीने व्यंकटेश माडगूळकरांचे नाव नवकथाकारात घेतले जाऊ लागले· "माडगूळकर हा मराठी साहित्यातला अंतरलेला शब्द आहे· त्यांच्या लेखनात विशेष कसब आणि कलात्मकता आहे· भाषेचा मराठी अस्सल वाण, शब्दांची मोजकी व नेमकी ठेवण, दोनचार वाक्यात निसर्ग आणि व्यक्ती सजीव करण्याचे सामर्थ्य, आटोपशीर पण बोलके संवाद, शब्दकलेतील सच्चाई

इ·त्यांची कथालेखनाची वैशिष्ठ्ये"[30]

याच कालखंडात दि·बा·मोकाशी, जी·ए·कुलकर्णी, शांताराम रेगे, बी·रघुनाथ, कृष्णमूर्ती या काळात नवकथा बहराला आली होती· तिच्या विकासात पुढील कथाकारांनाही मोलाचे योगदान दिले आहे· दि·बा·मोकाशी, ज्ञानेश्वर नाडकर्णी, दिलीप चित्रे, सदानंद रेगे, शंकर पाटील, विद्याधर पुंडलीक, खानोलकर, आनंद यादव, रणजीत देसाई इ·

<u>रणजीत देसाई</u> : यांच्या कथेचे विश्व विविधरंगी आहे· त्यांनी ऐतिहासिक कथा लिहिल्या आहेत· तसेच समाजबोधपर अशाही कथा लिहिल्या· त्यांची वृत्ती काव्यात्म असल्याने ती वास्तवापेक्षा अद्भूतात आणि आदर्शात अधिक रमते· त्यामुळे त्यांच्या ग्रामीण कथांतून अतिशय चित्रमय वर्णने आढळतात· साध्याभोळ्या आणि सात्विक वृत्तीच्या शेतक-यांचे चित्रही देसाई अत्यंत भावपूर्ण रीतीने रेखाटतात· खेड्यातील निरनिराळी व्यक्तिचित्रे रंगविताना त्यांच्यातील उजळ बाजू रंगविण्याचा प्रयत्न करतात· "कणव" व "जाण" या कथासंग्रहातून काही सकस व कलात्मक अशा कथा त्यांनी लिहिल्या आहेत· पण एकंदरीत त्यांची वृत्ती अतिरंजितेकडे वळणारी आहे· "कातळ" या संग्रहातील "पेरा उगवला" व "पांढर उठली" या दोन्ही दीर्घकथा· त्यांच्या याच वृत्तीची साक्ष पटवितात· "रूपमहल" या कथेपासून ऐतिहासिक वातावरणात ते अधिक वावरताना दिसतात· "विराणी", "असा रंगला विडा", "अशी छेडिली तार", "अशी रंगली प्रीत" या कथांतील ऐतिहासिक वातावरण त्यांच्या काव्यात्म प्रतिमेला पोषक ठरल्याची साक्ष पटते·

1963 पासून कथालेखन करू लागलेले आनंद यादव हे ग्रामीण कथाकार म्हणून नावाजलेले आहेत· "मातीखालची माती" या पहिल्याच कथासंग्रहात आपले वेगळेपण त्यांनी सिध्द केले· कथातून छोटे छोटे भावप्रसंग रंगवतात· कथा संवादात्मक असतात· अनेकदा आत्मनिवेदनपर शैलीतून लिहिलेल्या असतात· व्यक्तिचित्रणात्मक कथा आहेत· व्यक्ती दारिद्र्य व भूक यांनी कशी पोखरली गेली आहे, जगण्यासाठी आटापिटा करावा लागत असतानाही त्यांच्यात कशी जिद्द आहे· त्यांच्या भावना

कशा जिवंत आहेत, त्यांच्यातली माणूसकी कशी जागृत आहे हे कथांतून चित्रित करताना दिसतात· मध्यमवर्गीय पांढरपेशा जीवनाचे आणखी एक भाष्यकार म्हणजे श्री·ज·जोशी· "पांढरपेशांचे जग" या त्यांच्या पहिल्या कथासंग्रहापासून "निवडक श्री·ज·" या कथाप्रवासापर्यंत वैचित्र्य आणि विविधता प्रत्ययाला येते· मध्यमवर्गीय समाजाच्या बदलत्या अंतरंगाची ओळख, काळ बदलतो तसे दिवस बदलतात याची जाणीव ते करून देतात· "मामाचा वाडा", "सुलभा", "राक्षस", "एका लग्नाची हकीगत" इ·कथात त्यांनी आत्मनिवेदनपर तंत्राचा वापर केलेला जाणवतो· त्यांची कथा य·गो·जोशी यांच्या कथेशी मिळतीजुळती वाटते· या संदर्भात पुष्कळ कथालेखकांची नावे पुढे येतात· "आंबट गोड" लिहिणारे अच्युब बर्वे, "लहरी" लिहिणारे र·ग·विद्वांस· "सखी" लिहिणारे शं·ना·नवरे, "झम्मन" लिहिणारे रा·भि·जोशी, "दर्शन" लिहिणारे भा·र· आठवले· "अहिल्या" लिहिणारे स·आ·जोगळेकर· हे नवे लेखक जुन्या रुळलेल्या मार्गानेच जात होते·म·ना·अदवंत म्हणतात, "या काळातील काही लेखकांच्या कथा घटनाप्रधान होत्या· काहींच्या व्यक्तिप्रधान होत्या, तर काहींच्या समस्याप्रधान होत्या· काहींनी केवळ रंजन हाच महत्त्वाचा निकष मानल्याने त्यांच्या कथा रहस्य चमत्कृती अनपेक्षित कलाटणी या मार्गाने गेल्या आहेत· "हे कथाकार गोष्ट चांगली सांगतात· त्यात चतुर संवाद असतात, नाट्यपूर्ण प्रसंग असतात· एखादे रहस्य असते आणि शेवटी वाचकांना विस्मयाचा धक्का देणारी कलाटणी असते· या कथेतील भावविश्व मृदू व मुलायम असल्याने आणि प्रा·फडके यांच्या कथेप्रमाणेच वाचकांना हवेहवेसे त्या देत असल्याने या कथा सामान्य वाचकांना प्रिय वाटतात· रचनाचातुर्य व लालित्यपूर्ण भाषा हे अशा कथांचे विशेष"[31] हे आपणास पटते·

प्रभाकर पाध्ये, ना·ग·गोरे, प·वि·जोशी, मंगेश पदकी या कथाकारांनी काही वेगळे दाखविण्याचा प्रयत्न केला· त्यांनी मोजकेच कथालेखन केले आहे· पण त्यात अनुकरण नाही किंवा नव्याजुन्याचा अभिनिवेश नाही· आपले अनुभवविश्व सरळ आविष्कृत करताना यांची कथा स्वतःचे एक रचनातंत्र स्वीकारते व स्वतःची अशी एक निवेदनशैली घेते· त्यातील अनुभव उत्कट असतो· त्यातील व्यक्ती जिवंत वाटतात आणि निवेदन त्या अनुभवांशी संवादी असते· त्यातून अनेकवेळा प्रकट होणारा सामाजिक आशय कथेशी एकरूप झालेला असतो· त्यामुळे त्यांच्या कथा अशा खास वाटतात·

काही प्रमाणात श्री·ना·पेंडसे यांच्या कथेसंबंधी असेच म्हणता येईल· पण एकंदरीत त्यांनी मोजकेच कथालेखन केले आहे· प्रादेशिक रंग आपल्या कथांतून त्यांनी आणले आहेत· पण खास ग्रामीण असा शिक्का त्यांच्या कथांवर मारणे कठीण जाते· अद्भूततेची कोंडी फोडून या काळातच कथा वास्तवात आली· केवळ रुचिपालट म्हणून ग्रामीण जीवनाचे चित्रण करण्याची प्रथा मागे पडली कारण इथून पुढे ग्रामीण कथा लिहिणारे लेखक प्रत्यक्ष घेतलेला अनुभव आपल्या कथेत चित्रित करू लागले होते·

नवकथेच्या संदर्भात जी·ए·कुलकर्णी यांची कामगिरी वैशिष्ट्यपूर्ण आहे· विद्याधर पुंडलिकांच्या "जपे"प्रमाणे त्यांची कथा जीवनातील व्यथांचा आणि अनामिक दुःखाचा शोध घेत असतो· कुंडलिकांच्या कथेत हळुवारपणा व व्यथा सूक्ष्म असतात तर जी·ए·कुलकर्णीच्या कथेतील यातना जीवघेण्या असतात· म्हणून त्यांचा आविष्कार भेदकअसतो· जी·ए·कुलकर्णी यांच्या कथांच्याबाबत म·ना·अदवंत म्हणतात, "जी·ए·ची कथा म्हणजे माणसाच्या मनामध्ये त्यांनी केलेले खोल अवगाहनच असते·"[32] "माणूस नावाचे बेट", "गिधाडे", "पुरुष", "पडदा" इ·कथा· त्यांच्या कथा मानवाच्या अथांग दुःखाचा वेध घेत दुःखाच्या तळाशी असणा-या तत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात· त्यांच्या कथांतून घडणा-या प्रत्येक पात्राचे दुःख वेगळे असते· प्रतिमांचा मुक्त वापर ते करतात·

1955 ते 1965 चा नवकथांचा कालखंड गोखले, गाडगीळ यांचा· याचवेळी नाटक, काव्य, कादंबरी कथा या चारही क्षेत्रात आपले वेगळेपण टिकवणारे चिं·त्र्य· खानोलकर कथांतून कोकणचा निसर्गरम्य परिसर उपयोगी आणतात· मानवी जीवनातील आर्तक्य, अद्भूततेचा शोध घेतात· या काळातला दुसरा महत्त्वाचा प्रवाह ग्रामीण व प्रादेशिक कथांचा· व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, म·भा·भोसले, उध्दव शेळके, र·वा·दिघे, ग·ल·ठोकळ, द·मा·मिरासदार, आनंद यादव यांच्या कथांतून ग्रामीण जीवनातील विसंगती, विक्षिप्तपणा, इरसालपणा दिसून येतो· रा·रं·बोराडेंची प्रादेशिक कथा विदर्भ मराठवाड्याकडील चालीरीती, ग्रामीण जीवनातले दैन्य, कारुण्य यांचे दर्शन कथांतून घडवतात· आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांच्या कथा जाती-जमाती, अन्यायाबद्दलची चीड व्यक्त करतात· भाषा समृध्द करण्याचे कार्य ग्रामीण कथांनी

केले·

आजच्या कालखंडात नव्या कल्पनांचा व नव्या प्रवृत्तींचा प्रवाह येत असताना लघुकथेचा ओघ जुन्या वळणाने जात आहे· ही कथा पांढरपेशी जीवन चित्रित करत आहे· "मध्यमवर्गीयांचे प्रश्न, समस्या, कोंडमारा उत्कटतेने दाखवताना ती एकाच पातळीवरून प्रवास करते व जाणिवेच्या थरावरच व्यक्ती व व्यक्तिमन, व्यक्ती व समाज, व्यक्ती व परिस्थिती असा संघर्ष रंगविते· या संघर्षात ती तपशील, नाट्य व भावोत्कटता आणते· त्यामुळे या कथांना परंपरागत आकृतिबंध आलेला आढळतो·"[33] हे म·ना·अदवंतांचे मत आपणास पटते, यानंतर खानोलकर, पानवलकर, ज्ञानेश्वर नाडकर्णी, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, वामन चोरघडे, रणजीत देसाई, अच्युत बर्वे, शंकरराव खरात, विजया राजाध्यक्ष, वसुंधरा पटवर्धन इ· या नंतरच्या पिढीत पारगावकर, प्रभू देसाई, वसंत फेणे, आनंद जातेगावकर, बाबूराव बागुल, रवींद्र पिंगे, महादेव मोरे, ह·मो·मराठे, तारा वनारसे, कमल देसाई हे कथालेखक-लेखिका येतात·

नवकथाकारानंतरच्या पिढीत दिलीप चित्रे, सोनटक्के, चारुता सागर, अनिल डांगे, भाऊ पाध्ये, सखा कलाल, बनहट्टी, आनंद पाटील, द·ता·भोसले, शाम मनोहर, इनामदार, विलास सारंग, भारत सासणे, रंगनाथ पठारे, भास्कर चंदनशिव, स्त्री कथा-लेखिकांचा उल्लेख करावा इतके त्यांचे कथालेखन विपुल झाले आहे केवळ रंजक कथा निर्माण करणा-या स्त्रीकथाकारांची संख्या खूप वाढली आहे· पण सुधा नरवणे, अंबिका सरकार, सुकन्या आगाशे, आशा बगे, रोहिणी कुलकर्णी, गौरी देशपांडे, सानिया, सुनिती आफळे, प्रिया तेंडुलकर यांचे कथालेखन प्रगल्भ, संवेदनशील आणि निष्ठापूर्ण वृत्तीने घडत आहे·

कथावाङ्·मयाच्या नव्या युगात जुन्या ध्येयवादाविषयी मूल्यांविषयी आस्था उरली नाही· निरनिराळ्या क्षेत्रातून लेखक उदयाला आले· या लेखकांना नव्या वास्तवाचा नीट अर्थ लागला नाही· स्वातंत्र्याचा अर्थ समजला नाही आणि एकूण बदललेल्या जीवनाचे आकलनही झाले नाही· यातून पुढे काय होईल याचे भान आले नाही· अशा परिस्थितीत मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राने व समीक्षेने जबरदस्त बदल घडवला अनेक

मासिके निघाली ती भरण्यासाठी कथा लिहू जावू लागल्या· दिवाळी अंकाची भरपूर निर्मिती झाली आणि या अंकांनी कथेला मार्ग मोकळा करून दिला·

"कथेला कादंबरीच्या जाचातून सोडविण्याचा खरा प्रयत्न गाडगीळ, माडगूळकर, गोखले, भावे यांनीच केला त्यांच्या प्रयत्नामुळे कथेला प्रचंड रूप, स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले आणि कथेला कथा म्हणून प्रतिष्ठा मिळाली· यांच्या यशाने "कथा" हा साहित्यप्रकार आहे आणि तो साहित्यप्रकार उत्तम दर्जाचे साहित्य देऊ शकतो हे दाखवून दिले" हे कमल देसाई यांचे विधान चिंतनीय वाटते· या नव्या लेखकांनी भाषेचे भान ठेवून कथालेखनाचे नित्य नवे प्रयोग केले· कथेला चैतन्य दिले आणि त्यानंतर नवी कथा आज बहरलेली, उत्कर्षाला पोहोचलेली आपणास दिसते· नवी कथा नव्या काळात नव्या आशय, विषय अभिव्यक्तीच्या दृष्टीने अमूलाग्र बदललेली दिसते· ती आता छापली जाते· त्यात सांगणारा-ऐकणारा असा संबंध न येता वाचक-लेखक हे नाते येते· आजच्या कथेत संघर्ष नसला तरी चालतो· खूप तपशील देवून अनेक गोष्टी सूचित करणारी आजची कथा डोळ्यांनी पाहता येते· आजच्या कथेत सिनेमाचे तंत्र आले आहे· "फ्लॅश-बॅक" असे काही तिला लागत नाही· भाषेचे भान आणि मुद्रण यातून आजच्या कथेने नवे वळण घेतले आहे आणि आपले स्वतंत्र क्षेत्र भरभराटीला आणले आहे·

आज कथेच्या क्षेत्रात अस्थिरता जाणवते· "तृटीत जीवनी सुट्या कल्पना" असे आजच्या जीवनाचे सूत्र झाले आहे· जीवनाच्या कोणत्याच आशयाला सुसूत्रता राहिलेली नाही· भांबावलेपणा सर्वत्र झाला आहे· कलावादी भूमिका जुनी आणि अपूरी ठरली आहे· म्हणावी तशी नवी पिढी तयार होत नाही असे दिसते आहे· स्वाभाविकच नव्या लेखकांची आवर्तामध्ये सापडल्यासारखी परिस्थिती झाली आहे· आजच्या लेखकाला निश्चितपणे कलावादाची कोंडी फोडावयाची आहे· पण त्याला खूप काही करावयाचे असून काहीच करता येत नाही, असे झाले आहे· उदंड मासिकांच्या निर्मितीत उदंड संख्येने कथालेखक सहभागी होत आहेत· जो उठतो तो कथालेखन करत सुटतो, असे चित्र आढळते आहे· त्यांच्या लेखनाला कुठेच गांभिर्य नसते· सखोलता नसते· वाड्·मयीन संकेताशी, परंपरेशी त्यांची ओळख नसते· वास्तवाचे भान नसते आणि

त्यामुळे आजची कथा उदंड कथा असूनही त्यांना कसला दर्जा कसली पातळी नाही"[34] असे वाटते.

आतापर्यंत कथालेखकांनी कथावाड्.मयात कशी मदत केली याचा आढावा घेतला. यापुढील दुस-या प्रकरणात कथावाड्.मयात स्त्रीलेखिकांनी दिलेले योगदान याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. फडके युगातील कथेचा साचा कधीच मागे पडला आहे. मनोविश्लेषण आणि त्यातही फ्रॉईडचे लैंगिकतेचे सूत्र घेऊन तेच काही व्यक्तिमत्वाभोवती गुंडाळत बसण्यातूनही मराठी कथा बाहेर आलेली आहे. माणसा-माणसांतील विविध संदर्भाती नातेसंबंध समजून घेण्याचा प्रयत्न करणारी, अंतर्मुख करणारी कथा पुढे येवू लागली. अनेक लेखक-लेखिकांना समजले की, माणसांची नाती कधीच एकपदरी, सरळसोट नसतात त्यात चमत्कारिक गुंता निर्माण करणारे द्वंद्व असते. त्यामुळे समस्यांचे उत्तर ठोकळेबाजपणे मिळत नाही. बदलते सामाजिक जीवन, मानसिक-भावनिक आंदोलने, स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या समस्या, मिळवत्या स्त्रीची परवड, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना मिळणारे दुय्यम स्थान, जीवनाबद्दलची आसक्ती, विरक्ती, द्वेष, प्रेम, जवळीकता, परस्परविरोधी संघर्ष हे सर्व प्रश्न कथेतून सोडविण्यासाठी अनेक स्त्रीलेखिका पुढे आल्या. त्यांनी कथाविकासात भर घातली. नव्या कथा लिहून कथाविकासात भर घातली. त्यांनी कथेतून स्त्रीजीवनाचे वास्तव दर्शन घडविले. परखडपणे स्त्रीच्या उद्ध्वस्त मनाचे, मानसिक कोंडमा-याचे दर्शन घडविले आहे, ते प्रत्ययकारी करण्याचा प्रयत्न केला आहे. ते दाखवून देण्याचा प्रयत्न पुढील प्रकरणात केला आहे. स्त्रीलेखिकांच्या कथा-विकासाच्या कार्यातील योगदानाचा आढावा पुढील प्रकरणात घेतला आहे.

संदर्भ


1. भवाळकर (डॉ.) तारा - लोककथा आणि मराठी कथात्मक साहित्य अनुबंध, "लोकवाड्.मय आणि साहित्य", 26/27 मार्च 1996, मुद्रित निबंध, पृ.1,
कुलसचिव, बा.प्र.साबळे, संयोजक - डॉ.विश्वनाथ शिंदे, मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

2. मांडे प्रभाकर - साहित्याचे अंतःप्रवाह, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे 30, प्रथम आवृत्ती 1975, पृ.48

3. उनि., पृ.50

4. उनि., पृ.51

5. उनि., पृ.52

6. बाबर (डॉ.) सरोजिनी - वनिता सारस्वत, समाजशिक्षण प्रकाशन, प्रथम आवृत्ती 1975, पृ.225

7. उनि., पृ.

8. उनि., पृ.

9. उनि., पृ.

10. फडके कमल - प्रकरण : मराठी कथेतील कलात्मकतेचा पुनर्विचार आणि तिचे भवितव्य - महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतील लेख, पृ.33, एप्रिल-मे-जून 1981 चा अंक, प्रकाशक - वा.म.जोशी, म.सा.पत्रिका पुणे 30, संपादक - आनंद यादव.

11. शेवडे इंदुमती - मराठी कथा उगम आणि विकास, सौमय्या प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती 1973, 172 नायगाव क्रॉस रस्ता मुंबई, पृ.574

12. भवाळकर (डॉ.) तारा - लोककथा आणि मराठी कथात्मक साहित्य अनुबंध "लोकवाड्.मय आणि साहित्य" 26/27 मार्च 1996, मुद्रित निबंध पृ.5
कुलसचिव - बा.प्र.साबळे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डॉ.विश्वनाथ शिंदे - मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

13· देशपांडे अ·ना· - "आधुनिक मराठी वाड्·चा इतिहास" भाग-2, व्हीनस प्रकाशन, 381 शनिवार पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती जाने·1958, पृ·443

14· उनि·, पृ·444

15· उनि·, पृ·450

16· गोखले अरविंद - "कथोपासक", दिलीप प्रकाशन 173, गिरगांव मुंबई, प्रथम आवृत्ती जानेवारी 1991, पृ·27

17· देशपांडे अ·ना·, "आधुनिक मराठी वाड्·चा इति" - भाग 2, व्हीनस प्रकाशन, 381 शनिवार पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती पहिली, जानेवारी 1958,

18· उनि·, पृ·449

19· शिखरे दा· न· - "लघुकथाकार", प्रकाशक - न·शं·कुलकर्णी, नवी पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती 1953, पृ·14

20· उनि·, पृ·30, 31

21· पाटील वर्षा §संपादिका" - "बहिणाई" दिवाळी अंक 1996, बहिणाई प्रकाशन, 930 शिवाजीनगर पुणे-4, या मासिकातील लेख, पृ·33, §प्रकरण : शेळके शांता - "एक तुटलेला दुवा"§

22· देशपांडे अ·ना· "आधुनिक मराठी वाड्·चा इतिहास भाग-2" व्हीनस प्रकाशन, 381 शनिवार पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, जानेवारी 1958, पृ·454

23· उनि·, पृ·455

24· उनि·, पृ·465

25· हातकणंगलेकर म·ना· - प्रदक्षिणा खंड दुसरा, पृ·85, लेख §स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कथा§, स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 30·

26· गोखले अरविंद - कथोपासक, दिलीप प्रकाशन, गिरगाव मुंबई-4, प्रथम आवृत्ती, जानेवारी 1991, पृ·85

27· उनि·, पृ·26

28· हातकणंगलेकर म·द· - प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 30, लेख - स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा, पृ·85

29· गोखले अरविंद - कथोपासक, दिलीप प्रकाशन गिरगाव, मुंबई-4, प्रथम आवृत्ती जानेवारी 1991, पृ·139

30· उनि·, पृ·45

31· अदवंत म·ना· - मराठी लघुकथेचा इतिहास, नीहारा प्रकाशन बुधवार पेठ, पुणे-2, प्रथम आवृत्ती, 5 एप्रिल 1993, पृ·162

32· उनि·, पृ·150

33· उनि·, पृ·160

34· यादव आनंद - संपादक - महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक एप्रिल-मे-जून 1981, लेख - देसाई कमल §मराठी कथेतील कलात्मकतेचा पुनर्विचार आणि तिचे भवितव्य§ पृ·34